सातारा

सकाळ

सातारा, मंगळवार, ८ सप्टेंबर २०१५

४

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# साहित्य वाचन, लेखनामुळे व्यक्तिमत्त्व समृद्ध : माने

**सकाळ वृत्तसेवा**

पळशी, ता. ७ : साहित्य वाचन, लेखनामुळे वैचारिक प्रगल्भतेबरोबरच व्यक्तिमत्त्व समृद्ध बनण्यास मदत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चुकतमाकत का असेना साहित्य लेखनात गुंतून राहावे, असे मत जिल्हा ग्रंथमहोत्सव समितीचे सदस्य व साहित्यिक डॉ. राजेंद्र माने यांनी व्यक्त केले.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी माने बोलत होते. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत अध्यक्षस्थानी होते.



**कोरेगाव : डी. पी. भोसले महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाच्या कार्यक्रमात बोलताना डॉ. राजेंद्र माने. व्यासपीठावर डॉ. विजयसिंह सावंत व इतर मान्यवर.**

"डॉ. सावंत म्हणाले, साहित्यनिर्मिती, संशोधनातून आनंद व प्रतिष्ठा मिळते; परंतु दूरचित्रवाणीचा पगडा वाढल्याने वाचन संस्कृतीची चळवळ कमी होत चालली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्व विकासासाठी साहित्य वाचन तसेच व्याख्याने ऐकण्याची सवय लावून घ्यावी."

किरण कीर्तिकर, तेजस्विनी माने या विद्यार्थ्यांनी गीतगायन व कविता वाचन केले. प्रा. डॉ. बाळासाहेब चव्हाण यांनी संयोजन केले. प्रा. डॉ. गजानन भोसले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. व्ही. नावडकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. उज्ज्वला मदने यांनी आभार मानले. अधीक्षक एन. जी. शेख, वाङ्मय मंडळाच्या अध्यक्षा प्रा. आर. के. मुल्ला, एस. जी. सायकर, प्रा. पी. के. घाटगे, आर. एस. शिंदे, डॉ. गणेश जाधव उपस्थित होते.